राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या राजकीय पक्षांची कार्यशाळा आयोजित करण्याबाबत.
**दि. ७.५.२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता**

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/रापनों-२०१७/प्र.क्र. ५५ /का.११
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०७ एप्रिल, २०१८

प्रति,
अध्यक्ष,
सर्व नोंदणीकृत पक्ष

विषय :- राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या राजकीय पक्षांची कार्यशाळा आयोजित करण्याबाबत.
**कार्यशाळेचा दि. ७.५.२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता**

महोदय,

आपल्याला माहीत आहे की, आपला देश सार्वभौम, समाजवादी, लोकशाही, गणतंत्र (Sovereign, Socialist, Democratic Republic) असून, विकासासाठी त्यांनी त्रिस्तरीय लोकशाही पध्दत स्वीकारलेली आहे.

२. विकास प्रक्रियेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना योग्य ते स्थान देण्याच्या दृष्टीने भारतीय संविधानामध्ये १९९२ साली अत्यंत महत्वपूर्ण अशी घटना दुरुस्ती (७३ व ७४ वी) करण्यात आली असून, राज्यातील २८,००० ज्या जवळपास स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये २.५० लाखापेक्षा जास्त लोकप्रतिनिधी दर ५ वर्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडून निवडले जातात. राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका (ग्रामपंचायती सोडून) राजकीय पक्षांच्या आधारावर लढविण्यात येतात.

३. निवडणूक प्रक्रिया निर्भय, मुक्त व पारदर्शक करण्यामध्ये राजकीय पक्षाची भूमिका अत्यंत मोलाची आहे. हे विचारात घेता भारत निवडणूक आयोगाने सुरुवातीपासूनच राजकीय पक्षांची नोंदणी व मान्यता देण्याची पध्दत सुरु केलेली आहे. मात्र, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी राजकीय पक्षांच्या नोंदणीची प्रक्रिया २००४ पासून सुरु केलेली आहे.

राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत सुमारे २४७ राजकीय पक्ष (भारत निवडणूक आयोगाकडून मान्यताप्राप्त १५ पक्ष धरुन) आहेत.

४. देशामध्ये लोकशाही सुदृढ व्हावी यासाठी राजकीय पक्षांनी चांगले उमेदवार उभे करणे व लोकशाहीच्या सिध्दान्ताप्रमाणे वागणे अपेक्षित आहे. यामध्ये आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे, गुंड प्रवृत्तीच्या लोकांना निवडणुकीपासून लांब ठेवणे, मतदारांवर विपरीत /अनुचित प्रभाव पडेल असे कोणतेही कृत्य न करणे, आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करणे, पक्षांतर्गत लोकशाही असणे, निवडणुकीची सर्व प्रक्रिया पारदर्शक रितीने पार पाडणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. मात्र, देशामध्ये अनेक निवडणुकांमध्ये वरील व इतर आवश्यक तत्वांचे पालन होत नसल्याचे वेगवेगळया माध्यमातून (वर्तमानपत्र, टीव्ही, रेडिओ, सभा, विचार, गोष्टी, इ.) अनेक लोकांनी (राजकीय पक्ष, स्वयंसेवी संस्था, विचारवंत, इत्यादी) मत व्यक्त करून निवडणुकीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या बाबी प्रतिपादित केलेल्या आहेत. तसेच निवडणुकीमध्ये वाढता पैशांचा वापर, गुंड प्रवृत्तीच्या लोकांना उमेदवारी देण्याचा वाढता कल, मतदारांना प्रलोभने व आमिष देण्यासाठी राजकीय पक्ष/उमेदवारांकडून करण्यात येणाऱ्या गैर उपाययोजना, इत्यादीबाबत अनेक न्यायालयांनीसुध्दा वेळोवेळी चिंता व्यक्त केलेली आहे.

५. भारत निवडणूक आयोग, विधी आयोग व अनेक स्वयंसेवी संस्था उदा. असोसिएशन फॉर डेमॉक्रॅटिक रिफॉर्मस् (ADR) यांनी सखोल अभ्यास करून निवडणूक सुधारणांबाबतचे अनेक प्रस्ताव सादर केलेले आहेत. यामध्ये खालील बाबींचा प्रामुख्याने समावेश आहे :-

(i) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ५ कायद्यांमधील विसंगती दूर करणे.

(ii) लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी एक स्वतंत्र नवीन कायदा तयार करणे.

(iii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी Corrupt Practices, Electoral Offences, Eligibility, Conditions, Disqualification, इत्यादींच्या यादीमध्ये आवश्यकतेप्रमाणे वाढ करणे.

(iv) उमेदवाराने सादर करावयाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये सुधारणा करणे. ( मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट पिटीशन (सिव्हील) क्रमांक ७८४/२०१५ Lok Prahari through its General Secretary S.N.Shukla v/s Union of India & Others मधील निकालाप्रमाणे)

(v) निवडणुकीमध्ये उमेदवारापेक्षा NOTA ला जास्त मते पडली असतील त्या निवडणुका रद्द करून नव्याने निवडणुका घेणे.

(vi) आयोगाच्या आदेशांचे पालन न करणाऱ्या राजकीय पक्षांची नोंदणी रद्द करणे. ( उदा. ५ वर्षामध्ये एकही उमेदवार निवडणुकीकरिता उभा न करणे, पक्षांतर्गत लोकशाही नसणे, स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय विहित वेळेत खर्चाचा हिशोब सादर न करणे, इत्यादी.)

(vii) पक्षांच्या नोंदणीसाठी Computer Software तयार करणे.

(viii) राजकीय पक्षांसाठी खर्चाची मर्यादा निश्चित करणे.

६. राजकीय पक्षाचे महत्व लक्षात घेता वरील व इतर विषयांवर विचारमंथन करुन वाटचालीची पुढील दिशा ठरविण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडून दि. ७.५.२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता **S.N.D.T. महिला विद्यापीठ पाटकर हॉल, मुंबई चर्चगेट कॅम्पस १, नाथीबाई ठाकरसी रोड, मुंबई** - ४०००२० येथे एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. यासाठी आपण सादर आमंत्रित आहात.

७. पक्षनोंदणी व चिन्ह वाटप यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने काढलेल्या आदेशाच्या प्रती व एक संक्षिप्त टिप्पणी आपल्या माहितीसाठी सोबत जोडली आहे. कार्यशाळेसाठी प्रत्येक पक्षाने जास्तीत जास्त २ प्रतिनिधी ( शक्यतो अध्यक्ष व सचिव ) यांना पाठवावे.

**मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,**

आपला,

( नि. ज. वागळे )
प्रभारी उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

वायु००९२-अ-२०